सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२६-२०२७

### कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

### ५

### फलोत्पादन

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर
२०२६

# कार्यक्रम अंदाजपत्रक
# २०२६-२०२७

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

## ५

## फलोत्पादन

| कार्यक्रम अंदाजपत्रकाचा क्रमांक | कार्यक्रम अंदाजपत्रकाचे नाव |
|---|---|
| १ | कृषी व पदुम विभाग ( कृषी ) |
| २ | कृषी व पदुम विभाग ( पशुसंवर्धन ) |
| ३ | कृषी व पदुम विभाग ( दुग्धव्यवसाय विकास ) |
| ४ | कृषी व पदुम विभाग ( मत्स्यव्यवसाय ) |
| ५ | कृषी व पदुम विभाग ( फलोत्पादन ) |

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना ... ... ... ... | १ |
| २. | भाजीपाला, रोपमळे, फळरोपमळे व स्थानिक उद्याने योजना (राज्यस्तर)... ... ... ... | २ |
| ३. | सिट्रस इस्टेट (२४०१बी०२५) (कार्यक्रम) (राज्य स्तर/१०० टक्के राज्य योजना) ... ... ... | ३ |
| ४. | भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना ... ... ... ... | ४ |
| ५. | फलोत्पादन पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण सल्ला व योजना व्यवस्थापन (हॉर्टसॅप्र) ... ... ... | ५ |
| ६. | मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र ... ... ... ... | ६ |
| ७. | प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना--प्रती थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन योजना) ... .. ... | ७ |
| ८. | मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना ... ... ... ... | ८ |
| ९. | अटल भूजल योजना ... ... ... ... | ८ |
| १०. | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान ... ... ... | ९ |
| ११. | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत गुणवत्ता केंद्राची स्थापना ... ... .. ... | ११ |
| १२. | इंडो-डच प्रकल्पांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या प्रकल्पाची प्रगती ... ... ... ... | १२ |
| १३. | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान २०२५-२६ मधील कार्यक्रम ... ... ... ... | १२ |
| १४. | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२६-२७<br>घटकनिहाय प्रस्तावित कार्यक्रम ... ... ... ... | १३ |
| १५. | राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियान सन २०२६-२७ ... ... ... ... | ३५ |
| १६. | वित्तीय तक्ते ... ... ... ... | ३७ |

# १. प्रस्तावना--

या प्रकाशनात कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या फलोत्पादन विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक प्रस्तुत करण्यात येत आहे. या अंदाजपत्रकात फलोत्पादन विभागामार्फत राबविण्यात आलेल्या व येत असलेल्या योजनांबाबतचा संक्षिप्त तपशील देण्यात आलेला आहे. तसेच सन २०२३-२४ साठी प्रस्तावित तरतुदी व त्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

महाराष्ट्र हे कृषी व औद्योगिक उत्पादनाद्वारे देशाच्या आर्थिक उत्पन्नात भरीव वाढ करणारे प्रगतशील राज्य आहे. महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती, जमिनीची प्रत आणि हवामानातील विविधता यामुळे राज्यात पीक लागवडीस मोठा वाव आहे. तथापि सिंचन सुविधेवरील मर्यादा, (१७.५७ टक्के) दुष्काळ अवर्षण प्रवण क्षेत्र यासारख्या अनेक कारणामुळे पारंपरिक पीकपद्धती फार किफायतशीर राहिलेली नाही. या सर्व बाबींचा विचार करून राज्याने सन १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन विकास कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. फलोत्पादन विकासाच्या दृष्टीने राज्यात सन २०१८-१९ पासून भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना नव्याने सुरु करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये नऊ कृषी हवामान विभाग आहेत. तसेच वेगवेगळी कृषी हवामानविषयक विविधता आहे. या विविधतेचा व कृषी हवामानाचा विचार करता महाराष्ट्रात विविध फळपिके येऊ शकतात. फलोत्पादनाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र सहा विभागात विभागला जाऊ शकतो. त्यामध्ये कोकण विभाग हा महत्त्वाचा विभाग आहे. कोकण किनारपट्टीमध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारी, मसाल्याची पिके चांगल्या रितीने येतात. हा विभाग फलोत्पादनासाठी अत्यंत उपयुक्त असल्यामुळे क्षेत्रवाढीवर तसेच इतर सुविधा निर्माण करण्यावर या विभागात भर देण्यात येत आहे. राज्यातील खानदेश हा भाग केळीसाठी प्रसिध्द आहे. या विभागातून देशातील विविध भागात मुख्यत: उत्तर भारतात केळीचा पुरवठा होतो. विदर्भात नागपूर, अमरावती भाग संत्र्यासाठी प्रसिद्ध आहे. नागपूर संत्र्याने बाजारात सध्या स्वत:चे असे नाव निर्माण केले आहे. राज्यातील मध्य व दक्षिण पूर्व कोरडवाहू भाग डाळिंब व मोसंबीसाठी प्रसिद्ध आहे. तसेच सांगली, पुणे, नाशिक, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर द्राक्ष व डाळिंब पिकविले जातात. द्राक्षामध्ये राज्याची देशांतर्गत बाजारपेठेत तसेच विदेशी बाजारपेठेत निर्यातीमध्ये चांगली वाढ आहे.

फळे, फुले, भाजीपाला पिके, मसाल्याची पिके, या उद्यानविद्या पिकाची उत्पादकता तसेच त्यापासून मिळणारा मोबदला अधिक असल्याने मागील दशकापासून या पिकाच्या लागवडीस विशेष प्रोत्साहन देण्यात येत आहे. यामुळे रोजगार निर्मिती व उत्पादनावर आधारित जोडधंदे यांना चालना मिळणार आहे. राज्यांतील उद्यानविद्या पिकाखालील क्षेत्रांचा अंदाज खालीलप्रमाणे आहे.

(अंतिम अंदाजित २०२४-२५)

| पीक | लागवडी खालील क्षेत्र (लाख हेक्टर) | उत्पादनक्षम क्षेत्र (लाख हेक्टर) | अंतिम उत्पादन (लाख मे.टन) |
|---|---|---|---|
| फळे | ८.९६ | ८.९६ | १६८.५४ |
| भाजीपाला | १२.५५ | १२.५५ | १४९.८२ |
| मसाला | १.३० | १.३० | १७.३३ |
| फुले | ०.१३ | ०.१३ | ०.७१ |

राज्यात ८.३१ लाखाहून अधिक क्षेत्र रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत विविध फळपिकांच्या लागवडीखाली आले आहे. फळाचे एकूण उत्पादन सुमारे १५२.५५ लाख मे. टन आहे. फळपिकाखालील क्षेत्रात भरीव वाढ झाल्याने राज्याला कृषी निर्यात प्रक्षेत्र (ॲग्रो एक्सपोर्ट झोन) मंजूर झालेले आहेत. यामध्ये आंबा, द्राक्ष, डाळिंब, केळी यांचा समावेश आहे.ङ

राज्यात सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून सुमारे १८.३६ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आहे. हे देशातील सर्वात अधिक क्षेत्र असणारे महाराष्ट्र राज्य आहे. त्याचप्रमाणे हरितगृहातील शेतीमध्येही देशात राज्य आघाडीवर आहे.

राज्यातील उद्यानविद्या पिकाखालील वाढते उत्पादन आणिा क्षेत्र विचारात घेऊन राज्याने कृषि उत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग बाजार माहिती केंद्र या दृष्टीकोनातून योजना राबविण्यास प्रोत्साहन दिले आहे. यामध्ये प्रकल्प अहवाल बनविणे, बाजार माहिती केंद्र आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात मालाचा नमुना पाठविणे यासारख्या अनेक योजनांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त कुटीर उद्योगाच्या स्वरुपात काजू प्रक्रिया युनिट, हळद जागतिक व्यापार करारामुळे उपलब्ध होणाऱ्या निर्यातीच्या संधी तसेच आयातीचे आव्हाने या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. मसाला प्रक्रिया युनिट, औषधी/सुगंधी वनस्पतीपासून औषधी सुगंधी द्रव्य विलग करणे वगैरे घटकांचा योजने अंतर्गत समावेश आहे.

फलोत्पादन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांची माहिती सन २०२१-२२ मधील तरतूद व झालेला खर्च २०२२-२३ मधील तरतूद व अंदाजित खर्च आणि २०२३-२४ मधील प्रस्तावित कार्यक्रम नमूद केलेला आहे. तसेच योजनेतील फलनिष्पत्ती बाबतही माहिती अंतर्भूत केलेली आहे.

# २. भाजीपाला, रोपमळे, फळरोपमळे व स्थानिक उद्याने (राज्यस्तर)

**१. योजनेची माहिती व उद्देश :--**

राज्यातील एकूण १४८ शासकीय रोपवाटिकांसाठी ही योजना राबविणेत येत आहे.

सर्व फळरोपवाटिकांचे संचलनासाठी रोपवाटिकांवर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या योजनेतून वेतन, मजुरी, परिरक्षण, कार्यालयीन खर्च, प्रवास खर्च इत्यादी बाबींसाठी तरतूद करण्यात येते. या योजने अंतर्गत पुढीलप्रमाणो एकूण १२०७ पदे मंजूर आहेत.

| अ. क्र. | पदनाम | वेतन श्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | कृषी अधिकारी | ४१८००-१३२३०० | ४२ |
| २ | कृषी पर्यवेक्षक | ३५४००-११२४०० | ९० |
| ३ | कृषी सहाय्यक | २५५००-८११०० | १३२ |
| ४ | लिपिक | १९९००-६३२०० | १३० |
| ५ | रोपमळा मदतनीस | १८०००-५६९०० | ६२२ |
| ६ | शिपाई | १५०००-४७६०० | १३४ |
| ७ | ग्रेड १ मजूर | १५०००-४७६०० | ४२ |
| ८ | टिलर ऑपरेटर | १५०००-४७६०० | १५ |
| | **एकूण पदे** | | **१२०७** |

या योजनेतून शासकीय रोपवाटिकासाठी वेतन व मजुरी, सामुग्री व विकास कामे करून घेण्यात येतात. या योजनेमुळे रोपवाटिकावर विविध फळे, फुले, भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती, मसाला पिके इत्यादींच्या कलमे रोपांचे उत्पादन घेण्यात येते.

**२. योजनेची सन २०२५-२६ साठी निश्चित केलेले लक्ष व साध्य :--**

शासकीय रोपवाटिकावर विविध फळझाडे व फुलपिकांचे ८३.०० लाख कलमे/रोपे उत्पादनाचे लक्ष निश्चित करण्यात आले असून उत्पादित होणारी कलमे/रोपे प्रामुख्याने भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना निगडीत फळबाग लागवड योजनेत व रोख विक्रीसाठी वापरली जातात.

**३. योजनेची सन २०२४-२५ साठी केलेली आर्थिक तरतूद, झालेला खर्च व फलनिष्पती :--**

सन २०२४-२५ साठी या योजनेत रुपये ६१३६.०६ लाख अनुदान उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यापैकी वर्ष अखेरीस रुपये ५८७४.५३ लाख खर्च झालेला आहे. प्रत्यक्षात ४९ लाख कलमे/रोपांचे उत्पादन झाले. ही तयार झालेली कलमे/रोपे विविध फळबाग लागवड कार्यक्रमात वितरित व रोख विक्रीने शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

फळझाडांची कलमे/रोपे उत्पादनाबरोबरच फुलझाडांची व भाजीपाला पिकांची, कलमे/रोपे उत्पादनाचे कार्यक्रमही शासकीय रोपवाटिकावर राबविणेत येत आहेत. सन २०१९-२० ते २०२५-२६ या वर्षातील योजनेचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

राज्य योजनांच्या सन २०१७-१८ मधील पुनर्रचनामुळे संपूर्ण सदर योजनेचे अनुदान एकाच लेखाशिर्षाखाली (२४०११७२२) उपलब्ध होत आहे.

| अ. क्र. | वर्ष | | अनुदान व खर्चाचा तपशील (रुपये लाखात) अनुदान | खर्च | | कलमे रोपे उत्पादन (संख्या हजारात) | कलमे रोपे विक्रीपासून महसूल जमा रक्कम हजारात |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | २०१९-२०२० | .. | ५०३२.६५ | ४९७३.६७ | .. | ७३५३ | १,६०,७०० |
| २) | २०२०-२०२१ | .. | ६२१९.५४ | ४२९६.६२ | .. | ८००० | १,८०,००० |
| ३) | २०२१-२०२२ | .. | ६९५३.२० | ५०९८.६० | .. | ५४७१ | २,१०,६७८ |
| ४) | २०२२-२०२३ | .. | ७६१९.५८ | ५३५६.६२ | .. | ५१४६ | २,००,८३३ |
| ५) | २०२३-२०२४ | .. | ७७१३.७५ | ५२०७.७१ | .. | ४७०० | ५७०४६ |
| ६) | २०२४-२०२५ | .. | ६१९१.२५ | ५८७४.५३ | .. | ४८६५ | ६२५७६ |
| ७) | २०२५-२०२६ | .. | ८४००.४७ | ३९००.५५ (डिसेंबर २५ अखेर) | | ४६६६ | ६१३६६ |
| ८) | २०२६-२०२७ (प्रस्तावित) | .. | ९६०४.२१ | .. | .. | .. | .. |

## ३. सिट्रस इस्टेट (२४०१बी०२५) (कार्यक्रम) (राज्य स्तर/१०० टक्के राज्य योजना)

मध्यवर्ती रोपवाटिका उमरखेड, ता. मोर्शी, जि. अमरावती, तालुका फळरोपवाटिका धिवरवाडी, ता. काटोल, जि. नागपूर आणि तालुका फळरोपवाटिका तळेगाव, ता. आष्टी, जि. वर्धा तालुका फळ रोपवाटीका, इसारवाडी, जि. औरंगाबाद व तालुका फळरोपवाटिका चांदूरबाजार ता. चांदूरबाजार जि. अमरावती या ५ फळरोपवाटिकांच्या जागेवर "सिट्रस इस्टेट" स्थापन करण्यात आले आहेत. "सिट्रस इस्टेट" ह्या "स्वायत्त संस्था" म्हणून स्थापन करण्यात येत आहेत. संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा आणि कार्यकारी समिती सिट्रस इस्टेट स्थापन करण्यात आल्या आहेत. संत्रा उत्पादक सर्व शेतकरी सर्वसाधारण सभेचे सदस्य असणार आहेत. कार्यकारी समितीमध्ये दोन शेतकरी प्रतिनिधी, जिल्हा लिड बँक मॅनेंजर, जिल्हा पणन अधिकारी, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक, महाऑरेंजचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल.

सिट्रस इस्टेट अंतर्गत रोपवाटीकांवर सुधारित वाणांच्या मातृवृक्षांची लागवड करणे, त्या ठिकाणी आवश्यकतेनुरूप शेडनेट, पॉलीहाऊस उभारणे, सिंचन सुविधा इत्यादीची उभारणी करणे, सिट्रस इस्टेट प्रशासकीय इमारत बांधकाम, कार्यालय, प्रयोगशाळा, प्रशिक्षण भवन, निविष्ठा विक्री केंद्र, कलेक्शन, ग्रेडिंग, कोटिंग, पॅकिंग, साठवणूक युनिटची इ. बांधकामे प्रस्तावित आहेत. शेतकऱ्यांसाठी वाजवी दरात यांत्रिकीकरणाची सुविधा निर्माण करण्यासाठी अवजारे बँक स्थापन करण्यात येणार आहे. निविष्ठा केंद्रातून शेतकऱ्यांना वाजवी दरात निविष्ठा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रयोगशाळांना जैविक खत उत्पादन, मृद व पाणी परिक्षण, ऊती व पाने पृथ:करण यासाठी स्टिट्रस इस्टेटच्या धर्तीवर नाशिक जिल्ह्यातील तालुका रोपावाटिका निलगव्हाण, ता. मालेगाव येथे डाळींब इस्टेट आणि बीड जिल्ह्यातील मौजे-वडखेल, ता. परळी येथे सिताफळ इस्ट्रेट स्थापन करण्यास दि. ९ ऑक्टोबर, २०२४ नुसार मान्यता देण्यात आली असून यासाठी अनुक्रमे ३९४२.७४ लाख आणि ५३६०.२५ लाख इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

| अ. क्र. | वर्ष | | अर्थसंकल्पीय तरतूद (रु. लाख) | सुधारित अंदाज (रु. लाख) | अनुदान (रु. लाख) | खर्च (रु. लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | .. | १५००.०० | ३२३.४४ | ३१७.१८ | ३१७.१८ |
| २ | २०२०-२१ | .. | १५००.०० | १५००.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | २०२१-२२ | .. | १५००.०० | १३०५.२७ | ९५७.०७ | ९२०.७१ |
| ४ | २०२२-२३ | .. | ५९७३.९७ | १६७२.७१ | १६६६.४९ | १६६६.४९ |
| ५ | २०२३-२४ | .. | ६७७४.०० | ४७४७.८० | १३६४.०० | १३६४.०० |
| ६ | २०२४-२५ | .. | ६९५४.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | २०२५-२६ | .. | ७५०७.३३ | ३४८७.८० | १९०२.९५ | १९०२.९५ |
| ८ | २०२६-२७ (प्रस्तावित) | .. | ७२६६.६१ | ... | ... | ... |

--------------------

## ४. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना

राज्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-१९ च्या खरीप हंगामापासून राबविण्यासाठी शासन निर्णय क्रमांक राफयो-२०१८/प्र.क्र.४७/९-अे दिनांक ६ जुलै, २०१८ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, युवा शेतकऱ्यांसाठी रोजगार निर्मिती, पीक रचनेत बदल घडवून आणणे, उत्पन्नाचा शाश्वत स्त्रोत निर्माण करणे, प्रक्रिया उद्योगांसाठी आवश्यक कच्च्या मालाच्या उत्पादनात वाढ करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. या योजनेअंतर्गत एकूण १६ बहुवार्षिक फळपीकांची आवश्यकतेनुसार कलमे/रोपांद्वारे लागवड करण्यास मान्यता आहे.

योजनेची अंमलबजावणी :-

रक्कम रु. लाख

| वर्ष | आर्थिक लक्षांक | मंजूर आराखडा | वितरीत निधी | खर्च निधी | समर्पित | लागवड क्षेत्र (हे.) | लाभार्थी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | १००००.०० | १८००.०० | १२६४.३३ | ८७४.९९ | ३८९.३४ | ६०२७ | ६६९८ | |
| २०१९-२० | १६०००.०० | ५१५६.८४ | ४६९४.१०४ | ३६६०.८६ | १०३३.२४ | १७५०० | १९००० | |
| २०२०-२१ | ... | ११९००.०० | ४२२०.०० | ४१५१.३३ | ६८.६७ | कोवीड १९ महामारीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या बचतीच्या धोरणामुळे सन २०२०-२१ पासून नविन लक्षांक देण्यात आलेला नाही. सन २०१८-१९ व २०१९-२० मधील लागवडीच्या द्वितीय व तृतीय वर्षासाठीचे दायीत्व भागविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. | | |
| २०२१-२२ | ... | १०९००.०० | ... | ३८००.१५ | ... | | | |
| २०२२-२३ | १०४५०.०० | १०४५०.०० | ५०८९.०० | .. | ... | | | |
| २०२३-२४ | १०२५०.०० | १०२५०.०० | ७०७५.०० | ६७९२.७७ | ... | १३८०४.०० | १५७१५ | |
| २०२४-२५ | १०४५०.०० | १०४५०.०० | ७३१३.९५ | १२५८८.४५ | .. | २२५४९ | २७२९२ | |
| २०२५-२६ (प्रस्तावित) | १०४५०.०० | १०४५०.०० | ६२९०.०० | ६२७०.०० | ... | १२२७.२२ | १०९७ | दि. २१/१/२०२६ अखेर |

* सन २०२३-२४ मधील अखर्चित निधी रू. ५३७१.२३ लाख सन २०२४-२५ साठी पुनर्जिवीत करून दिला आहे. तो खर्च झालेला आहे.

* सन २०२५-२६ मध्ये प्राप्त झालेला निधी रु. ६२७०.०० लाख हा सन २०२३-२४ प्रथम व द्वितीय वर्षे तसेच सन २०२४-२५ प्रथम वर्षासाठी खर्च करण्यात आला आहे.

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०२५-२६ मध्ये राबविण्यासाठी प्रवर्गनिहाय रक्कम रु. १०४५०.०० लाख अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली असून शासन निर्णय, दिनांक १८ जुलै, २०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सद्य:स्थितीस सन २०२५-२६ साठी प्रवर्गनिहाय रु. ६२९०.०० लाख तरतूद उपलब्ध झालेली असून जिल्हानिहाय अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

---------------------

## ५. फलोत्पादन पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व योजना व्यवस्थापन (हॉर्टसॅप)

**उद्देश -**

सन २०११-१२ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत फलोत्पादन पिकावरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प मंजूर करण्यात आलेला आहे. आंबा, डाळिंब आणि केळी फळपिकावरील कीड रोगांचे सर्वेक्षण करणे तसेच कीड व रोगावरील उपाययोजनेसाठी शेतकऱ्यांना सल्ला देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

सदरचा प्रकल्प सन २०११-१२ पासून ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, सोलापूर, सांगली, नाशिक, जळगाव या नऊ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत कीड सर्वेक्षक, पेस्ट मॉनिटर, संगणक प्रचालक यांची नियुक्ती, प्रशिक्षण कार्यक्रम, सर्वेक्षण किटचा पुरवठा, संगणक आज्ञावली तयार करणे, एसएमएस सर्व्हिस, प्रपत्रे छपाई व औषध पुरवठा असे महत्त्वाचे घटक आहेत. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना कीड रोगाचे सर्वेक्षण करून उपाययोजनेसाठी सल्ले देण्यात येत आहेत. आंबा, डाळिंब, केळी, चिक्कू, संत्रा व मोसंबी या फळ पिकांकरिता सन २०१६-१७ मध्ये सदर प्रकल्प पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, हिंगोली, नांदेड, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा व नागपूर या २३ जिल्ह्यात राबविण्यात आला आहे. सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा क्रॉपसॅप अंतर्गत समावेश करण्यात आलेला आहे. सन २०२०-२१ पासून योजनेचा विस्तार २८ जिल्ह्यात करण्यात आला असून, सदर योजनेत काजू, भेंडी व टोमॅटो ही पीके नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

सन २०२५-२६ पासून योजनेचा विस्तार ३० जिल्ह्यांत ९ फळपिकांसाठी करण्यात येत आहे. (ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, पुणे, आहिल्यानगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छ. संभाजीनगर, जालना, बीड, लातुर, हिंगोली, नांदेड, धाराशिव, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, यवतमाळ, वाशिम, परभणी).

**योजनेची सन २०२३-२०२४ व २०२४-२५ आणि सन २०२५-२६ साठी केलेली आर्थिक तरतूद व झालेला खर्च आणि २०२६-२०२७ चा प्रस्तावित कार्यक्रम**

(रु. लाखात)

| अ.क्र. | योजना | सन २०२३-२४ | | | | सन २०२४-२५ | | | | सन २०२५-२६ | | | | सन २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक लाख हे. | | आर्थिक | | भौतिक लाख हे. | | आर्थिक | | भौतिक लाख हे. | | आर्थिक | | प्रस्ताविक |
| | | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | कार्यक्रम |
| १ | फलोत्पादन पिकावरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) | ६.९ | ६.९ | २४२.४२ | १७९.८४ | ७.० | ७.० | २४४.७९ | २०२.०० | ७.७ | ७.७ | २२७.९५ | १२०.६५ | १९०.०० |

--------------------

# ६. मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र

हळदीची उत्पादकता वाढविण्याचे दृष्टीने जिल्हा हिंगोली येथे मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या केंद्रामार्फत हळदीची लागवड, प्रक्रिया आणि विपणन यातील समस्या आणि उपाय यावर संशोधन केले जाईल. हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राद्वारे हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात घेऊन त्यांना किफायतशीर, विश्वासु व व्यवहार्य तंत्रज्ञानाची उपलब्धता, शेतकरी प्रशिक्षण सुविधांची निर्मिती, शेतकरी प्रशिक्षण आणि विस्ताराद्वारे नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार आणि उपलब्धता हळद पॅकेजिंग, मार्केटिंग, ब्रेडिंग, निर्यातीसाठी बाजार साखळी विकसित करणे, विविध योजनांच्या कृतिसंगमाद्वारे (convergence) शेतकरी, प्रक्रियादार, निर्यातदार यांना लाभ मिळवून देणे इत्यादी उपक्रम राबवले जातील.-

**योजनेची सन २०२३-२४ व २०२४-२०२५ आणि २०२५-२६ साठी केलेली आर्थिक तरतूद व झालेला खर्च आणि २०२६-२७ मधील लक्षांक प्रस्तावित कार्यक्रम**

(रु. लाखात)

| अ. क्र. | योजना | सन २०२३-२०२४ | | | | सन २०२४-२०२५ | | | | २०२५-२०२६ | | | | सन २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | | आर्थिक | | भौतिक | | आर्थिक | | भौतिक | | आर्थिक | | |
| | | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | -- |
| २ | मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र | .. | .. | ३५६७.४० | २३७१.७४ | .. | .. | ४१०० | ३३४१.६९ | .. | .. | २८०० | १५६४.९६ | ३५६२७.०० |

----------------

# ७. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना
# प्रती थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन योजना)

पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविणे, तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी जलवापर क्षमतेत वाढ करणे, तुषार व ठिबक अशा पाणी वाचविणाऱ्या सिंचन पद्धतींचा अवलंब करणे, यासाठी प्रोत्साहन देऊन सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्रात वाढ करणे या उद्देशाने सन २०१५-१६ पासून सूक्ष्म सिंचन योजना "प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना-प्रती थेंब अधिक पीक" या केंद्र शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनेमध्ये समाविष्ट करून राज्यात राबविण्यात येत होती. सन २०२२-२३ पासून ही योजना प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (वार्षिक कृती आराखडा आधारित) या योजनेचा घटक म्हणून राबविण्यात येत आहे. योजनेत केंद्र व राज्य हिस्स्याच्या अर्थसहाय्याचे प्रमाण ६०:४० आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून २०२५ मध्ये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदानाचे निकष असून क्षेत्राची मर्यादा ५ हेक्टर आहे. सद्य:स्थितीत सन २०२०-२१ पासून ही योजना महा.डी.बी.टी. पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे. महा.डि.बी.टी. पोर्टलवर शेतकऱ्यांना विविध योजनांसाठी लाभ देण्यात येत असून याकरिता शेतकऱ्यांना एकदाच अर्ज करावा लागतो. तसेच सन २०१८-१९ ते दि. ०४.०२.२०२६ या कालावधीत एकूण ९.६१ लाख हे. एवढे क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले आहे.

**सन २०१८-१९ पासून ते दि. ०४.०२.२०२६ या कालावधीमधील भौतिक व आर्थिक प्रगती खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | वर्ष | सूक्ष्म सिंचनाखाली क्षेत्र (लाख हे.) | लाभार्थी संख्या | अनुदान वितरित निधि (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | १.३१ | १७५०८४ | ४१५.९६ |
| २ | २०१९-२० | १.५२ | १९९२६१ | ५०५.४३ |
| ३ | २०२०-२१ | ०.७१ | ८७८२२ | १६३.८७ |
| ४ | २०२१-२२ | १.९१ | २,३०,१३१ | ५८०.५८ |
| ५ | २०२२-२३ | १.६१ | १,८४,४१४ | ५५६.८९ |
| ६ | २०२३-२४ | २.३९ | २,४७,५१५ | ८८९.५० |
| ७ | २०२४-२५ | ०.१३ | ११,७०८ | ४३.१८ |
| ८ | २०२५-२६ | ०.०३४८७ | ३१०९ | ११.१८ |
| | **एकूण** | **९.६१** | **११,३९,०४४** | **३१६६.५७** |

**(स्त्रोत-ई-ठिबक व महाडीबीटी पोर्टल) सन २०१८-१९ ते सन दि. ०४.०२.२०२६ या कालावधीत पीकनिहाय सूक्ष्म सिंचनाखाली आलेले क्षेत्र (लाख हे.)**

| अ.क्र. | पिके | वर्ष | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | एकूण |
| १ | कापूस | ०.४१ | ०.५५ | ०.१२ | ०.४३ | ०.५१ | १.०२ | ०.०४ | ०.००२४ | ३.०९ |
| २ | ऊस | ०.१२ | ०.१३ | ०.०६ | ०.२१ | ०.१६ | ०.२० | ०.०१ | ०.०००१६ | ०.८८ |
| ३ | इतर पिके | ०.४६ | ०.५१ | ०.३१ | ०.९३ | ०.३ | ०.७७ | ०.०३ | ०.०३११५ | ३.२५ |
| ४ | भाजीपाला | ०.०५ | ०.०८ | ०.०८ | ०.०३ | ०.४६ | ०.१५ | ०.०१ | ०.०००७१ | ०.९७ |
| ५ | केळी | ०.०६ | ०.०५ | ०.०२ | ०.०५ | ०.०७ | ०.०९ | ०.०१ | ०.००००७ | ०.३४ |
| ६ | डाळिंब | ०.०५ | ०.०६ | ०.०३ | ०.०७ | ०.०३ | ०.०५ | ०.०१ | ०.००००७ | ०.३२ |
| ७ | लिंबूवर्गीय पिके | ०.१० | ०.०९ | ०.०५ | ०.१२ | ०.०५ | ०.०८ | ०.०१ | ०.०००११ | ०.४८ |
| ८ | द्राक्ष | ०.०६ | ०.०५ | ०.०४ | ०.०७ | ०.०३ | ०.०३ | ०.०१ | ०.००००२ | ०.२८ |
| | **एकूण** | **१.३१** | **१.५२** | **०.७१** | **१.९१** | **१.६१** | **२.३९** | **०.१३** | **०.०३४८७** | **९.६१** |

**प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना-** सन २०२५-२६ करिता रु. ५९६.५८ कोटी रक्कमेचा वार्षिक कृती आराखडा मंजूर करण्यात आलेला आहे. दि. ०९.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार पहिला हप्ता रु. २५१.४१ कोटी प्राप्त झालेला असून ४ फेब्रुवारी २०२६ आखेरपर्यंत रु. २३२.७१ कोटी खर्च झालेला आहे.

सन २०२५-२६ मध्ये दि. २१.०५.२०२५ रोजीपासून महाडीबीटी पोर्टलवरील लाभार्थी निवड लॉटरी पद्धत ऐवजी प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य [FCFS] या तत्वावर निवड करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सद्य:स्थितीत योजने अंतर्गत दि.०४/०२/२०२६ पर्यंत ८,२५,१२२ लार्भार्थ्यांची निवड FCFS या तत्वांवर करण्यात आलेली आहे.

--------------

## ८. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना

## सूक्ष्म सिंचन घटक पूरक अनुदानाकरिता विविध योजना

राज्यातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अवर्षणप्रवण क्षेत्र तसेच आत्महत्याग्रस्त व नक्षलग्रस्त जिल्ह्यात मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना राबविण्यास दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे शासन निर्णयानुसार सदर योजना राज्यातील उर्वरीत १०७ तालुक्यांमध्ये राबविण्यासाठी शासन निर्णय निर्गमित झाला आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना प्रती थेंब अधिक पीक अंतर्गत अनुज्ञेय अनुदानाशिवाय मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पुरक अनुदान देऊन सुक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे ८० टक्के व ७५ टक्के एकूण अनुदान देण्यात येते. २०२१-२२ ते दि. ०४/०२/२०२६ या कालावधीमध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेकरीता रु. १०३४.२७ कोटी निधी शासनाने उपलब्ध करुन दिला आहे. २०२१-२२ ते दि. ०४/०२/२०२६ मध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत महा. डी. बी. टी. पोर्टलद्वारे ६,०९,६५६ लाभार्थ्यांना रु. ९५३.९० कोटी अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. शासन निर्णय दि. २४ एप्रिल, २०२५ अन्वये सन २०२५-२६ मध्ये रु. ४००.०० कोटी रक्कमेच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेला आहे. दि. ०४/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार रू. १०० कोटी प्राप्त झाले असून दि. ०४/०२/२०२६ पर्यंत रू २०.८५ कोटी खर्च झालेला आहे. दि. १३/०१/२०२६ रोजी उर्वरीत रु. ३००.०० कोटी निधी मागणी राज्य शासनास सादर करण्यात आलेली आहे.

--------------

## ९. अटल भूजल योजना

सदर योजना राज्यातील १३ जिल्ह्यातील ४० तालुक्यातील १३३९ ग्रामपंचायतीमधील १४४० गावांमध्ये केंद्र शासन व जागतिक बँक यांच्या अर्थसाहाय्याने सन २०२१-२२ ते २०२५-२६ या ५ वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येत आहे. अटल भूजल योजनेमधून या योजनेतील समाविष्ट गावामधील अल्प व अत्यल्प भूधारक आणि इतर शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे २५% आणि ३०% पूरक अनुदान देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २०२१-२२ ते दि १२/०१/२०२६ या कालावधीत महा. डी. बी. टी. पोर्टल द्वारे ३२.२५५ लाभार्थ्यांना एकूण रु. ४८.६५ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या दि. ०६ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रानुसार सदरील योजना दि. ३१/१०/२०२५ पासून बंद करण्यात आली आहे.

--------------------

## १०. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान

केंद्र शासनाने राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सन २००५-२००६ पासून राबविण्यास सुरुवात केलेली आहे. सन २०१४-१५ पासून सदरची योजना एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान या नावाने राबविण्यात येत आहे. या अभियानातील केंद्र व राज्य हिस्सा सन २०१४-१५ पर्यंत केंद्र ८५ टक्के व राज्य १५ टक्के होता, मात्र सन २०१५-१६ पासून केंद्र ६० टक्के व राज्य ४० टक्के यानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१ वैविध्यपूर्ण कृषी हवामान विभागानुसार प्रादेशिक अनुकूलता व गरजा लक्षात घेवून त्या त्या प्रदेशातील फलोद्यान क्षेत्राचा संशोधन, तंत्रज्ञान प्रसार, काढणीत्तोर तंत्रज्ञान, प्रक्रिया व पणन सुविधा यांच्या माध्यमातून समूह पद्धतीने सर्वांगीण विकास करणे.

२ शेतकऱ्याचे आर्थिक स्तर उंचावणे व आहारविषयी पोषणमूल्य वाढविणे.

३ अस्तित्वात असलेल्या फलोत्पादन विषयक विविध योजनांमध्ये समन्वय साधून एकरुपता आणणे.

४ पारंपरिक उत्पादन पद्धतीची आधुनिक शास्त्रीय ज्ञानाशी सांगड घालून तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार आणि प्रचार करणे.

५ कुशल आणि अकुशल विशेषत: बेरोजगार तरुणांकरिता रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेची उद्दिष्टे साध्य करण्याचे दृष्टीने विविध घटकांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. **गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य निर्माण करणे** (रोपवाटिका, उती संवर्धन प्रयोगशाळा), **क्षेत्रविस्तार** फळ पिके (ड्रॅगन फ्रुट, किवी, स्ट्रॉबेरी, ॲवोकॅडो, तेंदुफळ, पॅशन फ्रुट, ब्लुबेरी, आवळा, बेल, जांभुळ, करवंद, चिंच, फणस, मसाला पिके (हळद, मिरची, आले, बहुवार्षिक मसाले पिके), फुल पिके (दाड्यांची फुले, कंदवर्गीय फुले व सुट्टी फुले), आळिंबी उत्पादन, **जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन** (आंबा, मोसंबी, संत्रा व चिकु), **सामुहिक शेततळे व शेततळे अस्तरीकरण, संरक्षित शेती** (हरितगृह, शेडनेट व प्लास्टीक मल्चींग), **एकात्मिक अन्नद्रव्ये व एकात्मिक किड व्यवस्थापन, मनुष्यबळ विकास कार्यक्रम** (शेतकरी प्रशिक्षण), **मधुमक्षिका पालन, फलोत्पादन यांत्रिकीकरण** (ट्रॅक्टर २० पीटीओ, पॉवर टिलर, जमीन सुधारणा उपकरणे व पिक संरक्षण उपकरणे) **काढणीत्तोर व्यवस्थापन** (पॅक हाऊस, एकात्मिक पॅक हाऊस, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, शितगृह, शितखोली, रायपनिंग चेंबर, शितवाहन, कांदाचाळ, एकात्मिक शितसाखळी) या विविध घटकांसाठी वैयक्तिक लाभार्थी, लाभार्थी समुह, खाजगी क्षेत्र तसेच सार्वजनिक क्षेत्रासाठी अर्थसहाय्य दिले जाते.

या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने २४ ऑगस्ट, २००५ चे शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ स्थापन केलेले असून संस्था नोंदणी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० नुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांचेकडे नोंदणी करण्यात आलेली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी मा. सचिव कृषी यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती व जिल्हास्तरावरील जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा अभियान समिती स्थापन केलेली आहे.

अभियान अंमलबजावणीसाठी जिल्हा अभियान समिती प्रत्येक जिल्ह्याच्या फलोत्पादन विकासाच्या गरजेनुरुप वार्षिक कृती आराखडा तयार करते. राज्यस्तरावर सर्व जिल्ह्यांची आवश्यकता तपासून राज्यस्तरावर त्यास अंतिम स्वरुप देण्यात येते व त्यास केंद्र शासनाची मान्यता घेऊन सर्व जिल्ह्यांना त्यांनी शिफारस केलेल्या आराखड्यानुसार अनुदान उपलब्ध करून अभियानाची अंमलबजावणी करण्यात येते.

**सन २००५-०६ ते २०२४-२५ या वर्षातील वर्षनिहाय मंजूर आराखडा व झालेला खर्च याबाबतचा तपशील आकृती १ मध्ये देण्यात आलेला आहे.**




**Figure १ योजनेतील मंजूर आराखडा व खर्च तपशिल**

सन २००५-०६ पासून सन २०२४-२५ पर्यंत विविध घटकांवरील खर्च २५६१.४३ कोटी झालेला असून विविध घटकावरील झालेल्या खचार्च प्रमाण पुढीलप्रमाणे आहे.

(रक्कम रु. लाख)

| अ.क्र. | घटक | साध्य | |
|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक |
| १ | गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य (संख्या/हे.) | १९३२ | ३९४४.२७ |
| २ | क्षेत्र विस्तार (हे.) | ३१०६१३ | ४८८४०.८२ |
| | मशरुम युनिट (संख्या) | ४० | ३४१.८१ |
| | **एकूण क्षेत्र विस्तार** | **..** | **४९१८२.६३** |
| ३ | जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन (हे.) | ४९४८८ | ५४०५.६७ |
| ४ | सामूहिक शेततळे व शेततळे अस्तरीकरण (संख्या) | २८५७५ | ५५९३७.९७ |
| ५ | संरक्षित शेती (हे.) | ३०४८५ | ४६३४८.८३ |
| ६ | जैविक औषधी निर्मिती/पिक चिकित्सालय/उतीपाने तपासणी व एकात्मिक कीड/अन्नद्रव्ये व्यवस्थापन (संख्या/हे.) | ४४४९७ | २१२९.४७ |
| | सेंद्रीय शेती (हे.) | १५५२९ | २१२५.१६ |
| ७ | सेंटर ऑफ एक्सलन्स-इंडो-इस्त्राईल व इंडो-डच (संख्या) | ६ | ४१९६.९६ |
| ८ | मधुमक्षिका पालन (संख्या) | १०९८२ | १४१.८२ |
| ९ | फलोत्पादन यांत्रिकीकरण (संख्या) | ३४४७५ | १६०९९.१४ |
| १० | मनुष्यबळ विकास कार्यक्रम (संख्या) | ३०७३०१ | ४३१२.२५ |
| ११ | काढणीत्तोर व्यवस्थापन (संख्या) | २०४२३ | ३८६७२.०५ |
| १२ | पणन सुविधा (संख्या) | १७ | ८०.५९ |
| १३ | अभियान व्यवस्थापन | .. | १००९९.९४ |
| १४ | इतर घटक (BBD, TSG, GAP) (हे.) | ९६६६५ | १७४६५.९७ |
| | **एकूण** | | **२५६१४२.७२** |

## ११. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत गुणवत्ता केंद्रांची स्थापना

राज्यामध्ये विविध फळपिकांच्या लागवडीस असलेल्या बाबी विचारात घेता आंबा, संत्रा व डाळिंब या प्रमुख फळपिकांची उत्पादकता वाढविणेची आवश्यकता लक्षात घेऊन इस्त्राईल देशाच्या तांत्रिक सहकार्याने प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, नवीन जातींचा तसेच लागवड साहित्याचा वापर करणे, आदर्श कृषी पद्धतीचा अवलंब करणे त्याचबरोबर काढणीत्तोर तंत्रज्ञान, पणन व निर्यात याद्वारे या फळपिकांचे मूल्यवर्धन करणे या दृष्टीकोनातून इंडो-इस्त्राईल प्रकल्पांतर्गत विदर्भातील संत्रा, मराठवाड्यातील केशर आंबा, पश्चिम महाराष्ट्रातील डाळिंब व कोकणातील हापूस आंबा, या पिकांची निवड करण्यात आली होती. या प्रकल्पावरील झालेल्या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | केंद्रांची नावे | मंजूर वर्ष | प्रकल्प रक्कम (रु. लाख) | प्रकल्प खर्च (रु. लाख) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | आंबा गुणवत्ता केंद्र, डॉ. बा.सा.को.कृ.वि., दापोली | २०१०-११ | ६३६.०० | ६४०.८१ | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| २ | संत्रा गुणवत्ता केंद्र, कृषी महाविद्यालय, नागपूर | २०१०-११ | ४५४.४० | ४९३.६५ | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| ३ | डाळिंब गुणवत्ता केंद्र, म.फु.कृ.वि., राहुरी, जि. अहमदनगर | २०११-१२ | ४५८.०० | ३९२.९१ | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| ४ | केशर आंबा गुणवत्ता केंद्र, हिमायत बाग, जि. औरंगाबाद | २०१२-१३ | ७४४.०० | ७६१.७३ | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| | **एकूण** | | **२२९२.४०** | **२२८९.१०** | |

राज्यात भाजीपाला व फुलपिकांचे क्षेत्र मोठे आहे. या पिकातील अद्यावत तंत्रज्ञान व नविन प्रजातीची शेतकऱ्यांना माहिती व्हावी या दृष्टीने नेदरलॅन्ड देशाच्या सहकार्याने इंडो-डच प्रकल्पांतर्गत भाजीपाला गुणवत्ता केंद्र, केव्हीके, बारामती, जि. पुणे येथे व फुलपिके गुणवत्ता केंद्र-NIPHT तळेगाव, जि. पुणे येथे गुणवत्ता केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.

## १२. इंडो-डच प्रकल्पांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या प्रकल्पाची प्रगती

| अ.क्र. | केंद्रांची नावे | मंजूर वर्ष | प्रकल्प रक्कम (रु. लाख) | प्रकल्प खर्च (रु. लाख) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | भाजीपाला गुणवत्ता केंद्र, केव्हीके बारामती, जि. पुणे | २०१५-१६ | १३५३.५४ | १०००.०० | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| २ | फुलपिके गुणवत्ता केंद्र, NIPHT तळेगांव, जि. पुणे | २०१६-१७ | १२१८.९७ | ९९९.५१ | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| | **एकूण** | | **२५७२.५१** | **१९९९.५१** | |

## १३. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान २०२५-२६ मधील कार्यक्रम

सन २०२५-२६ या वर्षाकरिता केंद्र शासनाने १७०.८३ कोटी रकमेचा वर्षिक कृती आराखडा मंजूर केला असून त्यामध्ये ६० टक्के केंद्र हिस्सा रक्कम रुपये १०२.५० कोटी व ४० टक्के राज्य हिस्सा रक्कम रुपये ६८.३३ कोटी रकमेचा आहे. या कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात येणारे प्रमुख घटक व तरतूद पुढील प्रमाणे आहे.

(रु. लाख)

| अ.क्र. | बाब | आर्थिक कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | लागवड साहित्याची निर्मिती | ८४४.०० |
| २ | क्षेत्र विस्तार व अळिंबी प्रकल्प | २०३०.१५ |
| ३ | जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन | २३५.२० |
| ४ | सामूहिक शेततळे | १६०२.८८ |
| | शेततळे अस्तरीकरण | १७६.१२ |
| ५ | नियंत्रित शेती | ३४२०.०० |
| ६ | जैविक औषधी निर्मिती/पिक चिकित्सालय/उतीपाने तपासणी व एकात्मिक कीड/अन्नद्रव्ये व्यवस्थापन | ७२.७० |
| ७ | मधुमक्षिका पालन | १७.६० |
| ८ | फलोत्पादन यांत्रिकीकरण | १२७९.५० |
| ९ | मनुष्यबळ विकास एकूण | २३९.७० |
| १० | काढणीत्तोर व्यवस्थापन | ५०९२.१५ |
| ११ | पणन सुविधा | ०.१५ |
| १२ | नावीन्य पूर्णबाबी | .. |
| १३ | इंडो-इस्त्राईल COE-Sweet Orange Paithan, Aurangabad | .. |
| १४ | इंडो-इस्त्राईल COE बळकटीकरण व नवीन COE | १५००.०० |
| १५ | अभियान व्यवस्थापन | ५७३.१७ |
| | **एकूण** | **१७०८३.३२** |

# १४. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२६-२७

## घटकनिहाय प्रस्तावित कार्यक्रम

## आर्थिक रक्कम व आर्थिक मापदंड

(रुपये लाखात)

| अ.क्र. | घटक<br>(१) | अर्थसहाय्याची रक्कम<br>(२) | अर्थसहाय्याचे स्वरूप<br>(३) | भौतिक<br>(४) | आर्थिक<br>(५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **अ. संशोधन** | रु. १००.०० लाख/प्रकल्प | ICAR, CSIR, SAUs, राष्ट्रीय स्तरावरील सरकार अंतर्गत केंद्र सरकारच्या संस्था, एजन्सी आणि इतर स्थान विशिष्ट संस्था आवश्यकतेवर आधारित उपयोजित संशोधन आणि विकास कामे करतील<br>(i) बियाणे आणि लागवड साहित्य<br>(ii) तंत्रज्ञान मानकीकरण<br>(iii) तंत्रज्ञान संपादन आणि<br>(iv) प्रशिक्षण आणि FLD देणे, प्रकल्प मोडवर १००% सहाय्याने | .. | .. |
| २ | **ब. लागवड साहित्याचे पायाभूत सुविधा विकास** | | | | |
| | ब-१ लागवड साहित्याचे निर्मिती करणे | | | | |
| | i) मोठी रोपवाटिका (१ ते २ हेक्टर) | रु. पर्यंत. ३० लाख/हे.<br>प्रमाणानुसार मोठ्या रोपवाटिकेची किमत: १ हे.- ३०.०० लाख<br>२ हे.- ३०.०० लाख X २ | सार्वजनिक क्षेत्रासाठी १००% आणि खाजगी क्षेत्राला ४०% सहाय्य (बँक कर्जाशी निगडीत) सदर रोपवाटिकामधून, दरवर्षी फळपिके, वृक्ष प्रजाती व मसाला पिके व वृक्ष प्रजातीत सुगंधी वनस्पतीची कमीत कमी ५०,००० कलमे रोपे प्रती हेक्टर करणे बंधनकारक राहील. | ५ | ३००.०० |
| | ii) लहान रोपवाटिका (०.४ ते १ हेक्टर) | रु. २० लाख/हे. | सार्वजनिक क्षेत्रासाठी १००% आणि खाजगी क्षेत्राला ५०% अर्थसहाय्य कमीत कमी २५००० कलमे / रोपे प्रती हेक्टर बंधनकारक राहील. | १० | १००.०० |
| | iii) रोपवाटीका मानांकन निकषांची पूर्तता करण्यासाठी रोपवाटिकेच्या पायाभूत सुविधामध्ये सुधारणा करणे (२ हेक्टरपर्यंत) | जास्तीत जास्त ४.०० लाख/हे. | सार्वजनिक क्षेत्रासाठी १००% आणि खाजगी क्षेत्राला ५०% अर्थसहाय्य. | २० | ८०.०० |
| | iv) नवीन उती संवर्धन प्रयोगशाळा स्थापन करणे | २५ लाख रोपाच्या क्षमतेसाठी प्रति प्रकल्प रु.२५० लाखांपर्यंत किंवा किमान १० लाख रोपांसाठी प्री-रेटा आधारावर प्रकल्प. | सार्वजनिक क्षेत्राला १००% अर्थसहाय्यआणि खाजगी क्षेत्राच्या बाबतीत बँक कर्जाशी निगडीत अर्थसहाय्य ४०% प्रकल्प आधारित<br>कमीत कमी १० लाख रोपे प्रती वर्षे उत्पादन करणे आवश्यक | १ | १००.०० |
| | v) स्वयंचलित ट्रे सीडर युनिटसह नियंत्रित परिस्थितीत हाय-टेक प्लग प्रकार नर्सरी | ०.२ ते १ हेक्टर क्षेत्रासाठी आधारित प्रकल्प. @ रु. १२०० प्रति चौ.मी. प्रमाणानुसार. | सार्वजनिक क्षेत्राला १००% अर्थसहाय्यआणि खाजगी क्षेत्राच्या बाबतीत बँक कर्जाशी निगडीत अर्थसहाय्य ५०% प्रकल्प आधारित | १ | १२०.०० |

**तक्ता १६ - चालू...**

(रुपये लाखात)

| अ.क्र. (१) | घटक (२) | अर्थसहाय्याची रक्कम (३) | अर्थसहाय्याचे स्वरूप (४) | भौतिक (५) | आर्थिक (६) |
|---|---|---|---|---|---|
| | vi) भाजीपाला आणि मसाला पिके बियाणे उत्पादन | | | | |
| | अ) खुली परागीकरण पिके (१ ते २ हेक्टर) | रु ५०,०००/हे. | १ ते २ हेक्टर क्षेत्रासाठी सार्वजनिक क्षेत्राला १००% आणि खाजगी क्षेत्राच्या सहाय्याच्या बाबतीत ३५% अर्थसहाय्य | १०० हे. | ५०.०० |
| | ब) संकरित बियाणे (१ ते २ हेक्टर) | रु.१.८० लाख/हे. | सार्वजनिक क्षेत्राला १००% आणि खाजगी क्षेत्राच्या बाबतीत ३५% अर्थसहाय्य | ३० हे. | ५४.०० |
| | vii) गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य आयात करणे | प्रकल्पावर आधारित प्रकल्पाची किमत रु. पर्यंत, १५० लाख/वर्ष. | १००% दराने मदत सार्वजनिक क्षेत्र आणि FPOS, FIGS, SHGs आणि सहकारी बँक कर्जाशी सबसिडी ५०% SHGs प्रकल्प-आधारित. | | |
| | viii भाजीपाला बागायती पिकांसाठी हाताळणी, प्रक्रिया, पॅकिंग आणि साठवण यासह दर्जेदार बियाणे आणि लागवड साहित्याचे उत्पादन | प्रकल्पावर आधारित प्रकल्पाची किमत रु. पर्यंत, ३०० लाख वर्ष, | राज्य सरकारला १००% दराने मदत / सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्राच्या बाबतीत, प्रकल्प आधारित FPOS, FIGS, SHGS आणि सहकारी संस्थांसह बँक कर्जाशी सबसिडी ५०% अर्थसहाय्य | | |
| ३ | B. २ नवीन बागांची स्थापना (क्षेत्र विस्तार-प्रति लाभार्थी कमाल २ हेक्टर क्षेत्रासाठी). | | | | |
| | १. फळे | | | | |
| **खर्चिक पिके** | | | | | |
| | i) द्राक्ष, किवी, पेंशन फ्रूट, स्ट्रॉबेरी, ड्रॅगन फ्रूट, खजूर इत्याची फळ पिके. ठिबकशिवाय सिंचन (ठिबक इतर योजनांशी एकत्रित असावे) | १. स्ट्रॉबेरी रु. २.० लाख/हे | २ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४०% सहाय्य, ६०:४०, १ हप्तेमध्ये अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% | २०० हे. | १६०.०० |
| | | ii. किवी, पेंशन फ्रूट, सपोर्ट सिस्टीम अत्तलेले ड्रॅगन फ्रूट<br>रु. ड्रॅगन फळासाठी ६.७५ लाख हे.<br>रु. पेंशन फळासाठी २.७५ लाख हे.<br>रु. किवीसाठी २.५० लाख हे. | २ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये @ ४०% सहाय्य, ६०:४०, २ हप्ते अनुसूचित क्षेत्रासाठी ५०%<br>दुसऱ्या वर्षी ८०% झाडे जिवंत असावीत. | ५०० हे. | ८१०.०० |
| | | iii. द्राक्ष<br>रु. ३.०० लाख हे. समर्थन प्रणालीसह | २ हेक्टर पर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४०% सहाय्य. ६०:४० २ हप्ते | | |
| | | iv. खजूर (उती संवर्धन)<br>रु.४.०० लाख है | २ हेक्टर पर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४०% सहाय्य. ६०:४० २ हप्ते | | |

**तक्ता १६ - चालू...**

(रुपये लाखात)

| अ.क्र. (१) | घटक (२) | अर्थसहाय्याची रक्कम (३) | अर्थसहाय्याचे स्वरूप (४) | भौतिक (५) | आर्थिक (६) |
|---|---|---|---|---|---|
| | अ) ठिबक सिंचनाने | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमानुसार | मूळ खर्चाच्या नियमाव्यतिरिक्त, जसे की वर नमूद केल्याप्रमाणे ठिबक सिंचनाशिवाय, ठिबक सिंचन प्रणालीच्या स्थापनेसाठी अर्थसहाय्य | | |
| | ii केळी आणि अननस (By Suckers) | | | | |
| | अ) ठिबक सिंचनाशिवाय (ठिबक इतर योजनांसोबत एकत्रित असावे) | रु.१.१० लाख हे. | २ हेक्टर पर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४०% सहाय्य. ६०:४०, २ हप्ते. | | |
| | b) ठिबक सिंचनाने | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमानुसार | मूळ खर्चाव्यतिरिक्त म्हणजे दर नमूद केल्याप्रमाणे ठिबक सिंचनाशिवाय, ठिबक सिंचन प्रणालीच्या स्थापनेसाठी अर्थसहाय्य | | |
| | iii केळी आणि अननस (उती संवर्धनाद्वारे) | | | | |
| | अ) ठिबक शिवाय एकत्रीकरण (ठिबक इतर योजनांसह एकत्र केले पाहिजे) | रु. १.७५ लाख/हे. | २ हेक्टर पर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४०% राहाय्य. ६०:४०, २ हप्ते. | | |
| | b) ठिबक सिंचनाने | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमानुसार | मूळ खर्चाव्यतिरिक्त म्हणजे वर नमूद केल्याप्रमाणे ठिबक सिंचनाशिवाय, ठिबक सिंचन प्रणालीच्या स्थापनेसाठी प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या प्रमाणानुसार | | |
| | (ब) खर्चिक फळ पिके सोडून इतर पिके | | | | |
| | (i) एवोकॅडो, रॅम्बुटन, पर्सिमोन, डयुरियन, जर्दाळू, नाशपाती, पीच, मनुका, चेरी, ब्लूबेरी, अंजीर, मॅगोस्टीन इत्यादी फळ पिके. | | | | |
| | अ) ठिबक सिंचनाशिवाय (ठिबक इतर योजनांसोबत एकत्रित असावे) | रु.१.२५ लाख हे. | २ हेक्टर पर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये @४०% सहाय्य. ६०:४०, २ हप्ते. अनुसूचित क्षेत्रासाठी ५०%, दुसऱ्या वर्षी ८०% झाडे जिवंत असावीत. | १० हे. | ३.०० |
| | b) ठिबक सिंचनाने | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमानुसार | मूळ खर्चाव्यतिरिक्त म्हणजे वर नमूद केल्याप्रमाणे ठिबक सिंचनाशिवाय, ठिबक सिंचन प्रणालीच्या स्थापनेसाठी पीडीएमसीच्या नियमांनुसार | | |

**तक्ता १६ - चालू...**

(रुपये लाखात)

| अ.क्र. | घटक | अर्थसहाय्याची रक्कम | अर्थसहाय्याचे स्वरूप | भौतिक | आर्थिक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | (ii) फळ पिके, जसे-पपई, फसला, चिक्कू, चिंच, जामुन, बेल, करवंद, बेर, जॅकफ्रूट, खिरणी, सिताफळ, सफरचंद, आवळा, सीबकथॉर्न, गार्सिनिया, हनुमान फळ (सोर्सोप), कॅरोबमोला, जॅकफ्रूट, इ. | | | | |
| | अ) ठिबक सिंचनाशिवाय (ठिबक इतर योजनांसोबत एकत्रित असावे) | रु.७५,०००/हे. | २ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये @ ४०% सहाय्य. ६०:४०, २ हप्ते. अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% | | |
| | b) ठिबक सिंचनाने | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमानुसार | मूळ खर्चाव्यतिरिक्त म्हणजे वर नमूद केल्याप्रमाणे ठिबक सिंचनाशिवाय, ठिबक सिंचन प्रणालीच्या स्थापनेसाठी अर्थसहाय्य. | | |
| | क) सफरचंद, आंबा, पेरू, लिची, डाळिंब, मोसंबी इत्यादींच्या नवीन बागा. | | | | |
| | अ) ठिबक सिंचनाशिवाय (ठिबक इतर योजनांशी एकरूप असेल) | | | | |
| | (i) नियमित अंतर | रु. १.२५ लाख/हे. | २ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४०% सहाय्य. ६०:४०, २ हप्ते. | | |
| | (ii) उच्च घनता (सफरचंद व्यतिरिक्त) | रु. २.०० लाख/हे. | अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% दुसऱ्या वर्षी ८०% झाडे जिवंत असावीत. | | |
| | (iii) सपोर्ट सिस्टमसह सफरचंद मोठी उच्च घनता (किमान २२२२ झाडे प्रति हेक्टर. | रु. ५.०० लाख/हे. | | | |
| | (iv) अल्ट्रा उच्च घनता (सफरचंद व्यतिरिक्त) | रु. ३.०० लाख/हे. | | | |
| | (v) सपोर्ट सिस्टमसह Apple साठी अल्ट्रा हाय डेन्सिटी (किमान ३३३३ झाडे प्रति हेक्टर.) | रु. ७.५० लाख/हे. | | | |
| | b) ठिबक सिंचन सह एकत्रित | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमांनुसार | मूळ खर्चाव्यतिरिक्त म्हणजे वर नमूद केल्याप्रमाणे ठिबक सिंचनाशिवाय, ठिबक सिंचन प्रणालीच्या स्थापनेसाठी प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमांनुसार | | |

**तक्ता १६ - चालू...**

(रुपये लाखात)

| अ.क्र. (१) | घटक (२) | अर्थसहाय्याची रक्कम (३) | अर्थसहाय्याचे स्वरूप (४) | भौतिक (५) | आर्थिक (६) |
|---|---|---|---|---|---|
| | ii. भाजीपाला (जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्रासाठी, प्रति लाभार्थी) | | | | |
| | संकरित भाज्या (टोमॅटो, रताळे, अलोकेशिया, दुधी भोपळा, स्क्वेंश, झुकनी, फुलकोबी, कोबी, ब्रोकोली, शेवगा, कारले ब्रसेल्स, स्प्राउट्स, फ्रेंच बीन्स, फॅबिया बीन्स, मटार हिरवे, वांगी /औबर्गिन, शिमला मिरची, भेंडी, खरबूज, काकडी, हिरवी मिरची, गाजर, बीट रूट, सलगम, मुळा, नवलकोल, पालेभाज्या इ.) | रु. ६०.००० /-हे. | २ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४०% सहाय्य एकच हप्त्यामध्ये प्रो-रटा आधारावर. | | |
| | i कांदा आणि लसूण खुले परागीकरण | रु. ५०,०००/हे. | २ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४०% सहाय्य एकच हप्त्यात | | |
| | III. मशरूमची लागवड | | | | |
| | (a) मशरुम उत्पादन युनिट | रु. ३० लाख /युनिट | बँक कर्जाशी निगडीत सार्वजनिक क्षेत्रासाठी १००% खर्च आणि खाजगी क्षेत्रासाठी ४०% खर्च अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% | २० | २४०.०० |
| | (b) आळिंबी बीज उत्पादन युनिट | रु. २० लाख युनिट | बँक कर्जाशी निगडीत सार्वजनिक क्षेत्रासाठी १००% खर्च आणि खाजगी क्षेत्रासाठी ४०% खर्च, अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% | ५ | ८०.०० |
| | (c) कंपोस्ट मेकिंग युनिट | रु. ३० लाख युनिट | बँक कर्जाशी निगडीत सार्वजनिक क्षेत्रासाठी १००% खर्च आणि खाजगी क्षेत्रासाठी ४०% खर्च | १० | १२०.०० |
| | (d) कमी किमतीचे / लहान आकाराचे मशरूम उत्पादन युनिट | रु. २०० चौरस फूट आकाराच्या संरचनेसाठी प्रति युनिट २,०० लाख | प्रति युनिट ५०% दराने सहाय्य, प्रति लाभार्थी कमाल ५ युनिट्स. | ५० | ५०.०० |
| | **IV. फुले लागवड (प्रति लाभार्थी कमाल २ हेक्टर क्षेत्रासाठी)** | | | | |
| | i) दांडयांची फुले | रु. १.२५ लाख/हे. | सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४०% अर्थसहाय्य | ६० हे. | ३०.०० |
| | ii) कंदवर्गीय आणि रिझोमेंटिक फुले | | अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% | | |
| | (ग्लॅडिओलस, लिली, बेझी, जरबेरा ट्यूबरोज आणि केशर इ ) | रु. २.५० लाख/हे. | सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४०% अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% १ हप्त्यामध्ये | ३० हे. | ३०.०० |

(रुपये लाखात)

| अ.क्र. | घटक | अर्थसहाय्याची रक्कम | अर्थसहाय्याचे स्वरूप | भौतिक | आर्थिक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | iii) सुटी फुले (गुलाब, क्रायसैन्थेमम, ट्यूबरोज, चमेली, क्रॉसान्ड्रा, झेंडू, गेलार्डिया, कमळ, नीरियम, जास्वंद, बार्लेरिया इ.) | रु. ५०,०००/हे. | सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४० % अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% १ हप्त्यामध्ये | १०० हे. | २०.०० |
| | V) मसाले (जास्तीत जास्त २ हेक्टर प्रति लाभार्थी क्षेत्रासाठी) १ हप्ता | | | | |
| | i) बियाणे मसाले (अजवाई, बडीशेप, कारळे, सेलेरी, धणे, जिरे, मेथी, नायजेला, खसखस, काळे जिरे, मिरची इ.) | रु. ५०,०००/हे. | एकूण खर्चाच्या ४०% अर्थसहाय्य लागवड साहित्य आणि INM/IPM इत्यादीसाठी साहित्याचा खर्च भागविण्यासाठी योग्य दरानुसार. अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% | १९५४.२० | ३९०.८४ |
| | ii) रायझोमेंटिक आणि बल्बस मसाले (आले, हळद आणि लसूण | रु. १.०० लाख /हे. | एकूण खर्चाच्या ४०% अर्थसहाय्य लागवड साहित्य आणि INM/IPM इत्यादीसाठी साहित्याचा खर्च भागविण्यासाठी योग्य दरानुसार. अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% | ४२० हे. | १६८.०० |
| | iii) बहुवार्षिक मसाले (काळी मिरी, दालचिनी, कैसिया, लवंग, जायफळ, कोकम, कंबोज, चिंच, व्हॅनिला वेलची, ऑलस्पाईस, कढीपत्ता, स्टार बडीशेप, तमालपत्र इ.) | रु. १.०० लाख /हे. | एकूण खर्चाच्या ४०% अर्थसहाय्य लागवड साहित्य आणि INM/IPM इत्यादीसाठी साहित्याचा खर्च भागविण्यासाठी योग्य दरानुसार. अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% | १० हे. | ४.०० |
| ६ | सहावा, सुगंधी आणि औषधी वनस्पती (जास्तीत जास्त २ हेक्टर प्रति लाभार्थी क्षेत्रासाठी) | | | | |
| | i) महाग सुगंधी वनस्पती (गुलाब, रोझमेरी, ट्यूबरोज, जीरेंनियम, कॅमोमाइल, चंदन, दावना, जास्मिन, लॅव्हेंडर इ.) | रु. १.२५ लाख/हे. | एकूण खर्चाच्या ४०% अर्थसहाय्य लागवड साहित्य आणि INM/IPM इत्यादीसाठी साहित्याचा खर्च भागविण्यासाठी योग्य दरानुसार. अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% १ हप्त्यामध्ये | २०० हे. | १००.०० |
| | ii) इतर सुगंधी वनस्पती (पालमारोसा, लेमनग्रास, तुळशी, वेटिव्हर, जावा) सिट्रोनेला, गोड तुळस) | रु ५०,०००/हे. | एकूण खर्चाच्या ४०% अर्थसहाय्य लागवड साहित्य आणि INM/IPM इत्यादीसाठी साहित्याचा खर्च मागविण्यासाठी योग्य दरानुसार. अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% | २०० हे. | ४०.०० |
| | iii) औषधी वनस्पती (मुलेठी, शतावरी, कलिहारी, श्वेत मुसळी, गुगले, मंजिष्ठ, कुटकी, आटीस, जटामांसी, अश्वगंधा, ब्राह्मी, तुळशी, विदारिकंद, पिपळी, चिरटा, पुष्करमूल इ.) | रु. १.५ लाख/हे. | एकूण खर्चाच्या ४०% अर्थसहाय्य लागवड साहित्य आणि INM/IPM इत्यादीसाठी साहित्याचा खर्च मागविण्यासाठी योग्य दरानुसार. अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% १ हप्त्यामध्ये | ५०० हे. | ३००.०० |
| | vii) लागवड पिके (जास्तीत जास्त २ हेक्टर प्रति लाभार्थी क्षेत्रासाठी), एमआयडीएच योजनेंतर्गत ठिबक प्रस्तावित नसल्यास घटक ड्रिपमध्ये एकत्रित केले जावेत, नंतर ते इतर योजनेत एकत्र केले जावे. | | | | |

**तक्ता १६ - चालू...**

(रुपये लाखात)

| अ.क्र. | घटक | अर्थसहाय्याची रक्कम | अर्थसहाय्याचे स्वरूप | भौतिक | आर्थिक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | (अ) काजू आणि कोको | | | | |
| | a) ठिबक सिंचनाशिवाय | रु ७५,०००/हे. | २ हेक्टर पर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये @ ४०% सहाय्य, ६०:४० च्या दुसऱ्या वर्षी ८० % झाडे जिवंत असावीत. | | |
| | i) नियमित अंतर (ठिबक हे इतर योजनांसोबत एकत्र केले पाहिजे). | | २ हप्त्यांमध्ये लागवड साहित्य आणि इतर इनपुट खर्चाची पूर्तता करण्यासाठी प्रो-रेटा आधारावर दुसऱ्या वर्षी ८०% झाडे जिवंत असावीत | | |
| | b) सह आंतरपीक | रु ५०,०००/हे. | २ हेक्टर पर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये @ ४०% सहाय्य, ६०:४० च्या २ हप्त्यांमध्ये लागवड साहित्य आणि इतर इनपुट खर्चाची पूर्तता करण्यासाठी प्रो-रेटा आधारावर दुसऱ्या वर्षी ८०% झाडे जिवंत असावीत | | |
| | ii)उच्च घनता (किमान ४०० प्रति हेक्टर वनस्पती) (केवळ काजू) | रु.१.५ लाख/हे. | २ हेक्टर पर्यंतच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण क्षेत्रामध्ये @ ४०% सहाय्य, ६०:४० च्या २ हप्त्यांमध्ये लागवड साहित्य आणि इतर इनपुट खर्चाची पूर्तता करण्यासाठी प्रो-रेटा आधारावर दुसऱ्या वर्षी ८०% झाडे जिवंत असावीत | | |
| | b) ठिबक सिंचनाने | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमानुसार | मूळ खर्चाव्यतिरिक्त म्हणजे वर नमूद केल्याप्रमाणे ठिबक सिंचनाशिवाय, ठिबक सिंचन प्रणालीच्या स्थापनेसाठी अर्थसहाय्या PDMC नियमानुसार उपलब्ध असेल. | | |
| | (ब) बदाम आणि अक्रोडाच्या नवीन बागा | | | | |
| | अ) ठिबक सिंचनाशिवाय (ठिबक इतर योजनांसोबत एकत्र केले पाहिजे) | बदाम रु. ३.०० लाख/हे. अक्रोड: रु. ४.०० लाख/हे. | २ हेक्टर पर्यंतच्या क्षेत्रासाठी सामान्य क्षेत्रामध्ये ४०% दराने अर्थसहाय्य दुसऱ्या वर्षी ८०% झाडे जिवंत असावीत ६०:४० च्या २ हप्त्यांमध्ये लागवड साहित्य आणि इत्तर इनपुट खर्चाची पूर्तता करण्यासाठी प्रो रेटा आधारावर. | | |
| | b) ठिबक सिंचनाने | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमांनुसार | मूलभूत खर्चाव्यतिरिक्त , जसे की वर नमूद केल्याप्रमाणे एकत्रीकरणाशिवाय, ठिबक सिंचन प्रणालीच्या स्थापनेसाठी अर्थसहाय्य PDMC नियमांनुसार उपलब्ध असेल. | | |

**तक्ता १६ - चालू...**

(रुपये लाखात)

| अ.क्र. | घटक | अर्थसहाय्याची रक्कम | अर्थसहाय्याचे स्वरूप | भौतिक | आर्थिक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ४ | **B.३. जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन/बदली, छत व्यवस्थापन (प्रति लाभार्थी २ हेक्टर क्षेत्र मर्यादा)** | | | | |
| | i) मृत/मृत/वृद्ध झाडे काढून टाकणे | रु. १०,०००/हे. | एकूण खर्चाच्या ४०% अर्थसहाय्य, अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% १ हप्त्यामध्ये | १२०० हे. | ४८.०० |
| | ii) नवीन प्लांटने टॉप वर्किंग आणि गॅप भरणे | रु. १०,०००/हे. | एकूण खर्चाच्या ४०% अर्थसहाय्य, अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% १ हप्त्यामध्ये | १२०० हे. | ४८.०० |
| | iii) पोषक व्यवस्थापन, कीटक व्यवस्थापन आणि यासाठी इनपुटची किंमत सिंचन | रु. ४०,०००/हे. | एकूण खर्चाच्या ४०% अर्थसहाय्य, अनुसूचित क्षेत्रासाठी ५०% १ हप्त्यामध्ये | १२०० हे. | १९२.०० |
| ५ | **B.४. सामुहिक शेततळे** | | | | |
| | अ) समुदायासाठी पाणी साठवण संरचना- शेत समुदायावर बांधकाम टाकी, तलाव/प्लास्टिक / RCC अस्तर वापरणारे जलाशय | रु. २४.०० लाख प्रति युनिट. घनमीटर सर्वसाधारण भागात ८० रुपये प्रति आणि जास्तीत जास्त ३०,००० घन मीटर क्षमता. | किमान ५०० मायक्रॉन प्लास्टिक फिल्स किंवा RCC/HDPE अस्तर वापरून कमांड एरियाच्या आधारावर ३०,००० घनमीटर साठवण क्षमतेसाठी आणि प्रो-राटा आधारावर कमांड एरियाच्या १० हेक्टर सिंचनासाठी ७५% अर्थसहाय्य. | ८०० | २४००.०० |
| | b) पाणी साठवण रचना व्यक्ती - वापरून शेत तलाव टाक्या इत्यादींचे बांधकाम प्लास्टिक/आरसीसी अस्तर | रु.१.५० लाख प्रति युनिट | खर्चाच्या ५० टक्के रु. ७५००० जास्तीत जास्त | ५०० | ३७५.०० |
| | c) कूपनलिका/बोअरवेल बांधणे (हा घटक फक्त इतर घटकांसह एकत्रीकरणात विचारात घेतला जाईल. | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमानुसार | प्रति थेंब अधिक पिक योजनेच्या नियमांनुसार | | |
| | ड) लवचिक पाणी साठवण टाकी (हा घटक फक्त इतर घटकांसह एकत्रीकरणात विचारात घेतला जाईल घटक) | रु. ८,०००० लिटर पाणी साठवण क्षमता असलेली टाकी | पूर्वोत्तर आणि हिमालयीन राज्य, अनुसूचित क्षेत्रे, अस्थिर गावे, अंदमान आणि निकोबार आणि लक्षद्वीप बेटांमध्ये जास्तीत जास्त ५०००० लिटर/लाभार्थी पर्यंत प्रो-रेटा आधारावर वेगवेगळ्या क्षमतेसाठी विहित मापदंडानुसार ५०% सहाय्य. | | |
| ६. | **B.५. संरक्षित शेती** | | | | |
| | १. पॉली हाऊस / हायब्रीड / मागे घेण्यायोग्य संरचना | | | | |
